# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/११५६०/२०१७,　　　　　　　　　　　　　　　　　　पुणे शहर, दिनांक- ३०.१२.२०१७

**विषयः-३१ डिसेंबर व नववर्ष आगमना निमित्ताने करण्यात येणारी वाहतुक जनजागृती (Traffic Awareness) बाबत......**

--------OO---------

वाहतूक शाखा पुणे शहर यांचे वतीने १ जानेवारी २०१७ पासून ते दिनांक- २९/१२/२०१७ रोजी पर्यंत एकुण १७६६२ मद्य पिऊन वाहन चालविणा-या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे तसेच नववर्षाचे अनुषंगाने मद्य पिऊन वाहन चालविणा-या वाहनचालकांवर कारवाई करीता विशेष मोहीम चालू केली असून दिनांक- २९/१२/२०१७ या दिवशी एकुण ३०४ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

विशेषतः दिनांक ३१/१२/२०१७ रोजी.रात्री १२ नंतर नागरीक नववर्षाची सुरुवात दरवर्षी प्रमाणे अतिशय आनंदात, जल्लोषात साजरा करणार आहेत. त्या अनुषंगाने जादा गर्दी होणा-या रस्त्यांवर वाहतुक शाखा, पुणे शहर यांचेकडून सायंकाळी १८.०० वा.पासून वाहतुक आवश्यकतेनुसार वळविण्यात येणार आहे. सर्व शहरात एकुण २८ ठिकाणी नाकाबंदी लावण्यात येणार असून ५६ ब्रिथ ॲनालायझर मशिनद्वारे ड्रंक ॲन्ड ड्राईव्हची कारवाई करण्यात येणार आहे.मद्य प्राशन करुन वाहन चालविण्यामुळे नववर्षाच्या पुर्वसंधेस मोठ्या प्रमाणात अपघात होतात ते टाळण्यासाठी ३१ डिसेंबर रोजी ड्रंक ॲन्ड ड्राईव्हची कारवाई करणार आहोत. ज्या वाहनचालकांवर कारवाई केली जाईल त्यांचा वाहनचालविण्याचा परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. वाहतुक शाखेतर्फे नागरीकांच्या सोयीसाठी तसेच वाहतूक सुरळीत ठेवण्याकरीता दिनांक ३१/१२/२०१७ रोजी ८४ अधिकारी व ७३९ कर्मचारी इतका बंदोबस्त लावण्यात येणार आहे.

पुणे शहर वाहतूक शाखेकडून शहरातील नागरीकांना अवाहन करण्यात येते की, मद्य प्राशन करुन वाहन चालविणे टाळावे. दुचाकी वाहन चालविताना हेल्मेट घालुन सुरक्षित प्रवास करावा.नविन वर्षाची सुरुवात अपघात विरहीत होणेकरीता वाहतुकीच्या नियमांचे पालन करुन पोलीसांना सहकार्य करावे.